# प्रेसनोट दि.०८/०३/२०१८

आज दि.०८/०३/२०१८ रोजी जागतिक महिला दिना निमित्त शिवाजीनगर पोलीस मुख्यालय येथे सकाळी १०.०० ते ०२.०० या वेळेत पुणे शहर पोलीस आयुक्तालयाकडील महिला पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता थॅलेसिमीया सोसायटी महाराष्ट्र व कन्स्पेट, हेल्थ सोल्युशन प्रा.लि. व पोलीस आयुक्तालय, पुणे शहर यांचे संयुक्त विद्रयमाने आहार विषयी व कॅन्सर विषयी व्याख्यान व आरोग्य तपासणी आयोजित करण्यात आली. सदर कार्यक्रमास श्री.शेषराव सुर्यवंशी, पोलीस उप आयुक्त,मुख्यालय-२, पुणे शहर, श्री. माधव शिंदे, सपोआ (मा.सं.वि.), श्रीमती उज्वला पिंगळे, सपोआ (आस्थापना), श्रीमती वैशाली माने, सपोआ (प्रशासन) तसेच रुबी हॉल क्लिनिकचे डॉ.विजय रामानंद व कॅन्स्प्ट हेल्थ कडील श्री.शैलेंद्र कडू व त्यांचा स्टॉफ उपस्थित होता. रुबी हॉल क्लिनिकचे तज्ञ डॉ.विजय रामानंद यांनी महीला पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना आहार विषयक व निरोगी प्रकृती राहण्यासंबंधाने मार्गदर्शन केले. कॅन्स्प्ट हेल्थ कडील श्री.शैलेंद्र कडू व त्यांचा स्टॉफनी हजर महिला पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची १) ब्लड शुगर-रॅन्डम २) हेमोग्राम ३) लिपीड प्रोफाईल ४) ब्लड प्रेशर ५) जनरल हेल्थ चेकअप या शारिरीक चाचण्या घेऊन महिला पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची शारिरीक तपासणी करण्यात आली. सदर कार्यक्रमाचे उद्घाटन मा.श्री.शेषराव सुर्यवंशी, पोलीस उप आयुक्त,मुख्यालय-२, पुणे शहर यांचे हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे डॉ.रामानंद यांचे स्वागत सपोआ श्रीमती वैशाली माने यांनी केले. तसेच थॅलेसिमीया या आजाराबाबत जनजागृती होणेकरीता पुणे शहरातील पब्लिक वाहतूक करणारे रिक्षावर प्रसिध्दी पत्रक लावून जनजागृती करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. तसेच सदर आजारासंबंधाने डॉ.रामानंद यांनी त्यांचे भाषणाद्वारे माहीती दिलेली आहे. सदर कार्यक्रमास सुमारे ४००-४५० महिला पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सपोआ श्री.माधव शिंदे यांनी कार्यक्रमाचे शेवटी सर्वांचे आभार मानले.

**(शेषराव सुर्यवंशी)**
पोलीस उप आयुक्त,
मुख्यालय- २,पुणे शहर.


CONCEPT





